## प्रकरण - ३

## गुरुकुल पध्दती

पूर्वीच्या काळी गुरुगृही गेल्यानंतर शिष्याना शिक्षण संपेपर्यंत तेथेच रहावे लागत असे. गुरुंच्या सान्निध्यात राहून अध्यायन करण्याचा या पध्दतीला गुरुकुल पध्दती असे म्हणतात.

शिष्याची ही अध्ययन प्रक्रिया सतत १२ ते १४ वर्षे चालत असे. अध्ययनामध्ये गुरु, शिष्य आणि त्यांच्या भोवतीचा परिसर, एवढेच घटक असत. त्या सर्वांचा परिणाम शिष्यांच्या अध्ययनावर होत असे. समाजापासून दूर, एकांतात गुरुचे, हे आश्रम असत. उपनिषत्काली ब्रह्मज्ञानप्राप्तीसाठी गुरुंचा शोध घेत रानावनातून, अरण्यातून, शिष्याना जावे लागे. हातात समिधा घेऊन, शिरोव्रत धारण करुन, नम्रपणाने गुरुंकडे जावे लागे. गुरुंच्या आश्रमात दररोज गुरुंची सेवा करुन, गुरुंना प्रसन्न करुन घ्यावे लागे. गुरुचे सतत आज्ञापालन करावे लागे. अध्ययन काळात ब्रह्मचर्यव्रताचे पालन करावे लागे. साधारणत: वर्षभरात गुरु, शिष्याची परीक्षा घेत असत. त्यात यशस्वी झाल्यानंतर मग गुरुंची मर्जी शिष्यावर बसे व शिष्याची अध्ययन प्रक्रिया चालू होत असे.

पूर्वीच्या काळी गुरु आणि शिष्य यांचे संबंध ज्ञानविक्रेता व ज्ञानग्राहक असे नसून, सर्वप्रकारे शिष्याला मार्गदर्शन करणे, दैनंदिन जीवन जगण्यास आवश्यक ते धडे गुरुंकडून मिळत असत. शारीरिक श्रमाला प्रतिष्ठा मिळत असे. गुरुंच्या गृही गेल्यावर ब्राह्म मुहूर्तावर उठून, प्रातर्विधी उरकून , स्नानसंध्या करावी लागे. तसेच गुरुंच्या पूजेला लागणारी सामग्री

समिधा, दर्भ, कुश, दूर्वा, फुले इ. गोळा करावी लागत असे. त्यासाठी काट्याकुट्यातून मार्ग काढावा लागे. शारीरिक श्रमाची सवय बालवयातच शरीरात होत असल्याने, शरीर निरोगी आणि बळकट बनत असे. बौद्धिक श्रमाबरोबरच शारीरिक श्रम केल्याने देहाची मानसिक तयारी देखील उत्तम होत असे. गुरुंच्या सान्निध्यात ध्यान-धारणा, मनन-चिंतन केले जाई. त्यामुळे मन एकाग्र करण्यास मदत होई. त्यामुळे मन आनंदी व उल्हसित होई. यामुळे अध्ययन देखील सखोल व परिणामकारक होत असे. शरीराबरोबरचे बुध्दी - मन - आत्मा यांचा देखील क्रमाक्रमाने विकास घडून येई. संस्कारक्षम अशा बालवयात गुरुंच्या सहवास, गुरुंचा आदर्श सतत लाभत असे. गुरुंचे अनुकरण करण्याची संधी मिळत असे. गुरुंचा पितृतुल्य हात सतत विद्यार्थ्यांच्या पाठीवर असे. गुरु आणि गुरुपत्नी हेच विद्यार्थ्यांचे माता-पिता बनत. घरी आलेल्या शिष्यांवर ते पुत्रवत् प्रेम करीत. योग्य ते मार्गदर्शन करीत. शिष्यांच्या वर्तनाकडे सतत त्यांचे लक्ष असे. त्यामुळे शिष्यांना गैरवर्तन करण्यास अजिबात वाव नसे. अशा तऱ्हेने विद्यार्थ्यांच्या जीवनाची उभारणी मजबूत पायावर होत असे. शारीरिक, बौध्दिक-मानसिक अशा सर्वांगीण विकासास तेथे योग्य असे वातावरण असे. घरच्या लाडांनी विद्यार्थी बिघडला असे म्हणायला जागाच नसे. त्यातून विद्यार्थी गैरवर्तन करत असेल तर त्याला शिक्षा केली जाई. एकंदरीत गुरुंच्या सान्निध्यात, गुरुंच्या आज्ञेने विद्यार्थ्यांना दैनंदिन कामकाज करावे लागे. धार्मिक शिक्षणामुळे, सामाजिक जीवनाचे धडे बालपणीच मिळत असत. सुखासीनतेपासून विद्यार्थ्यांना अलिप्त राहावे लागल्याने कष्टाची सवय लागत असे. ध्यान धारणेमुळे व देवतेच्या उपासनेमुळे बुध्दी तल्लख बने. चिंतन - मननामुळे एकाग्रतेची सवय देहाला-चित्ताला लागत असे.

गुरुंचे आश्रम नगरापासून किंवा गावापासून दूर असत. निसर्गाच्या सान्निध्यात, नद्यांच्या काठी असे असल्याने विद्यार्थ्यांना अध्ययनास पोषक असे वातावरण मिळत असे. सात्त्विक आहार-विहार, प्रसन्न नैसर्गिक वातावरण या सर्वांमुळे विद्यार्थ्यांचे शिक्षण आनंददायी असे.

शिष्याशिष्यांमध्ये श्रीमंत-गरीब असा भेद नसे. राजपुत्र असो वा एखादा गरीब ब्राह्मण पुत्र असो गुरुगृही समान न्याय असे. राजघराण्यात लाडात वाढलेला पुत्रदेखील इतर शिष्यांबरोबर गुरुंची सेवा करीत असे. रानावनात जाऊन सर्व कामे करीत असे. त्यामुळे शिष्यांमध्ये भेदभाव उरत नसे. गुरुंकडे जाणारे सर्व शिष्य समभावाने रहात असत. मानवतेच्या दृष्टीने हे एक चांगले तत्व विद्यार्थ्यांत बिंबविले जाई.

पुस्तकी ज्ञानाखेरीज व्यावहारिक शिक्षणाचे धडे गुरुंजवळ मिळत असत. हारीतद्रुम मुनींनी सत्यकाम जाबालला त्याच्या अध्ययनापूर्वी शेती-विषयक कामगिरी सोपविली होती. कारण तो वैश्य व्यवसाय करणारा होता. पशुपालन व शेतीवर उपजीविका करीत असे. म्हणून त्याच्या जीवनाचे अविभाज्य असे अंग – गोसंवर्धन आणि वन्यरक्षणाचे काम – गुरुंनी त्याच्यावर सोपविले.त्याच्यावर उपनयन संस्कार करून अत्यंत दुबळ्या चारशे गायी त्याच्याजवळ देऊन, " सौम्य, यांची तू सेवा कर जोपर्यंत त्यांच्यात वाढ होऊन त्या एक हजार होत नाहीत तोपर्यंत पुस्तकी शिक्षण अपुरे समज". तेव्हा सत्यकामने अटीचे पालन करून दाखविले. तसेच गायी चरायला नेत असता बैल त्याच्या नजरेला पडला. तेव्हा त्याला सृष्टीच्या निर्मितीचे कारण कळले. प्रत्येक गोष्ट शिक्षकाने शिकवायची नसते. तर निरीक्षणातून बरेच काही शिकायचे असते.

अग्निहोत्र, अग्नी पेटवून भोजन बनविणे, लाकूडफाटा गोळा करणे, हिंस्त्र श्वापदांपासून स्वत:चे रक्षण करणे, थंडी ऊन-वारा-पाऊस यांबरोबर स्वत:चे समायोजन करणे इ. चे ज्ञान त्याला मिळाले. सूर्य-अग्नी-वारा-विद्युत इ. निसर्गशक्ती जीवनाला उपकारक असल्याने त्यांचे योग्य ते साहाय्य घेण्यासाठी प्रार्थनेचे महत्व त्याने जाणले. एकंदरीत निसर्गाच्या सान्निध्यात राहून निसर्गापासून त्याने शिक्षणाचे धडे घेतले. प्रत्येकापासून काहीतरी शिकण्यासारखे असते. प्रत्येकातील आत्मतत्त्व जाणून घेवून प्रत्येकात परमात्मा पहायला तो शिकला. मनुष्य हा विचारशील प्राणी आहे. आणि शिकणे ही त्याची प्रवृत्ती आहे.

गुरुकुल पध्दतीत आत्मनिरीक्षण करण्यास शिष्याना संधी मिळत असे. त्यातून ही विद्यार्थ्यांना शिक्षण मिळत असे. या संदर्भात एक कथा आहे.[2] देव, मानव व दानव हे सर्व प्रजापतीजवळ जातात. आणि म्हणतात की, "आम्हाला काहीतरी उपदेश द्या." त्यावर प्रजापतीने केवळ "द" अक्षर उच्चारले आणि त्यानाच विचारले की, "यापासून तुम्ही काय बोध घेतलात?"

देव-मानव-दानव यानी आत्मनिरीक्षणाने स्वत:चे दोष जाणले. ते काढून टाकण्यासंबंधीचा उपदेश "द" अक्षरापासून त्यानी घेतला.
उदा. देव हे विलासी, चैनी असल्यामुळे त्यानी इंद्रियदमन करण्याची गरज जाणून द = "दाम्यत" असा अर्थ घेतला.
तर मानवाची प्रवृत्ती लोभी असल्याने त्यानी द="दत्त" म्हणजे दान धर्म करा असा अर्थ घेतला.
तर असुरानी द="दयध्वम्" म्हणजे प्राणिमात्रावर दया करा, जगा आणि जगू द्या असा अर्थ घेतला. कारण ते हिंसक व क्रूर स्वभावाचे होते.

12396
A

शिक्षणाचा खरा उद्देश- सर्वांगीण विकास, हा आत्मनिरीक्षणातून होतो हे लक्षात येते. आपल्यातील दुर्गुण शोधून ते नाहीसे करता येतात.

सुकेशा, सत्यकाम, सौर्यायणि, कौसल्य, भार्गव, कबंधी हे सहा शिष्य पिप्पलाद ऋषींच्या आश्रमात जाऊन शिकत असल्याचे उदाहरण आहे.[3]
तसेच हारीतद्रुम ऋषींकडे सत्यकाम जाबाल,[4] तसेच –

वरुणाकडे त्याचा पुत्र भृगु,[5] प्रजापतीकडे इंद्र व विरोचन[6] शिक्षण घेत असल्याचे दिसून येते.

यानंतरच्या काळातही ही पध्दती रूढ असल्याचे दिसून येते. रामायण काळात राम-लक्ष्मण विश्वामित्रांकडे तर महाभारतात कौरव-पांडव गुरु द्रोणांकडे शिक्षण घेत. क्षत्रियाना आवश्यक असे सैनिकी शिक्षण ही गुरु देत असत. पौराणिक वाङ्मयात कृष्ण-सुदामा, सांदीपनींच्या आश्रमात शिकत असल्याचे दिसून येते.

पूर्वीच्या काळी गुरुंना श्रेष्ठ, मानाचे स्थान असे. राजे लोक देखील गुरुंचा मान राखीत असत. ज्ञान हे सर्वात श्रेष्ठ मानले जाई. पावन वातावरणात अध्ययन केल्याने शिष्याच्या मनात पवित्र भावना जागृत होई.

विद्यार्थी व गुरु मिळून एकत्र प्रार्थना करण्याची पध्दती होती.
"ओम् सह नाववतु। सह नौ भुनक्तु।
सहवीर्यं करवावहै। तेजस्विनावधीतमस्तु।
मा विद्विषावहै। ओम् शान्तिः शान्तिः शान्तिः।"
–या शांति-पाठात संघटनेची भावना प्रतीत होते. मिळून मिसळून खाणे-पिणे, फिरणे, काम करणे या संघटनेच्या भावनेतूनच "कुल" शब्द निर्माण झालेला आहे. म्हणूनच या पध्दतीला "गुरुकुल" असे नाव दिलेले आहे.

ही पध्दती आदर्श शिक्षण पध्दती आहे असे म्हणता येईल. या पध्दतीचे फायदे अनेक आहेत. भावी आयुष्याच्या दृष्टीनेही ते उपयुक्त असत.

१] नियमित आहार-विहार व दैनंदिन कामकाजाची सवय लागते.

२] पूर्वीच्या काळी दैनंदिन गरजा कमी होत्या. त्यामुळे जास्तीत जास्त वेळ अध्ययन, ध्यान धारणा, चिंतन-मनन इ. मध्ये खर्च करता येई.

३] गुरुंच्या आदर्शाचे सतत अनुकरण करण्याची संधी मिळत असे.

४] श्रीमंत गरीब असा भेदभाव नसे. सर्वांना समान वागणूक मिळे.

५] अभ्यासाला पोषक असे शांत, निसर्ग रम्य वातावरण असल्याने विद्यार्थ्यांची चित्तवृत्ती एकाग्र होत असे.

६] शारीरिक कष्टाची सवय लागत असे. शरीर व मन दोन्ही निरोगी बनत असे. ( Sound mind in Sound body.)

७] निसर्गाशी समायोजन करण्याची सवय लागत असे.

८] सत्य, नीतिमत्ता, गुरूजनांबद्दल आदर, त्याग, प्रामाणिकपणा, कर्तव्य निष्ठा इ. मूल्यांची जोपासना होई.

९] आध्यात्मिक ज्ञानाकडे कल असल्याने "साधी राहणी व उच्च विचारसरणी" अंगी बाणत असे.

१०] गुरु व शिष्य यांच्यात जिव्हाळ्याचे नाते असल्याने त्यातून मानवता, सच्चारित्र्य, राष्ट्रउभारणी, सामाजिक बांधिलकी इ. संस्कार कळत न कळतच विद्यार्थ्यांवर होत असत. यातूनच धार्मिक संस्कार घडत असत.

उपनिषदात ज्ञानार्जन म्हणजे प्रामुख्याने आत्मतत्वाचा बोध करुन घेणे, गुरु-शिष्यात घरगुती स्वरुपाचे आपुलकी नाते असल्याने शिष्य देखील जीवावर उदार होऊन, गुरुचे कार्य करीत असत. त्याचे आज्ञापालन स्वत:चे कर्तव्य समजत असत.

धौम्य ऋषींच्या शेताचा बांध फुटला असता "आरुणि" स्वत: त्या ठिकाणी आडवा पडला. आणि आपल्या देहाच्या सहाय्याने त्याने पाणी अडवून धरले. रात्रभर शरीर पाण्याने गारठून गेले, तरी त्याची फिकीर केली नाही. अशा शिष्यांबद्दल गुरुंनाही साहजिकच प्रेम वाटत असे.

एकंदरीत ही गुरुकुल पध्दती आदर्श शिक्षण पध्दती होय असे म्हणता येईल. येथे शिक्षण हे "ग्राहक-विक्रेता या भावनेने दिले जात नसून पक्का संस्कारांसह ते दिले जात असे. जीवनमूल्ये विद्यार्थ्यांत रुजविली जात असत. चांगल्या फळाचे बी, चांगल्या जमिनीत रुजल्यावर योग्य त्या खत पाण्याने जसे चांगले झाड येते. त्याप्रमाणे या शिष्यांतूनच आदर्श गुरु निर्माण होत असत. अशा तऱ्हेने गुरु-शिष्य परंपरा सुरु होते. ज्ञानाचा पक्का ठेवा परंपरेने जतन करुन ठेवला जाई. शिक्षण संपवून परत जाताना गुरु, शिष्यांना आशिर्वाद देताना म्हणत की, "असेच पुष्कळ शिष्य तयार करा". एका दिव्याने असंख्य ज्ञानज्योती पेटविल्या जात असत. त्यामुळे सुसंस्कृत समाज निर्माण व्हायला, देशाची, स्वधर्माची, राष्ट्राची प्रगती व्हायला मूळ कारण म्हणजे ही गुरुकुल पध्दती होय, असे म्हणावेसे वाटते.

येथे शिक्षणाचा दुरुपयोग करायला जागाच नाही. ज्ञानाने फक्त

आनंद, सुख-समाधान लाभत असल्याने "ज्ञानार्जन व ज्ञानदान" या दोन्ही गोष्टींना जीवनात श्रेष्ठ मूल्य प्राप्त झालेले होते. विद्याधनाची महती अनेक श्लोकात सुभाषित-कारानीही गायली आहे, ती यामुळेच.

म्हणूनच असे वाटते की, शिक्षणाकडे पाहण्याचा आजचा व्यावहारिक दृष्टिकोन बदलून, शिक्षणातील औपचारिकता कमी करून, विज्ञानाचा आधार घेवूनही गुरुकुल पध्दती आपल्या देशात जास्तीत जास्त प्रमाणात सुरु करायला पाहिजे.

आजही अगदी नगण्य स्वरूपात ती कुठे कुठे दिसून येते. उदा. रवींद्रनाथ टागोर यांच्या "शांतिनिकेतन" शिक्षण संस्थेत. तेथे निसर्गाच्या सान्निध्यात, कला गुणांची जोपासना करणारे शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करणारे शिक्षण, हे शिक्षण आहे. पण त्याचे प्रमाण विस्तृत व्हायला पाहिजे.

टीपा -

१] छांदोग्योपनिषाद् [अ. ४ खं. ४श्लो. ५]

२] बृहदारण्यक. [अ. ५. ब्रा. २]

३] प्रश्न.

४] छांदोग्य.

५] तैत्तरीय.

६] बृहदारण्यक.